# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ/मनपा-२०१७/प्र.क्र. १४ /का.५
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा मार्ग,मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २ फेब्रुवारी, २०१७

प्रति,
सर्व महानगरपालिका आयुक्त.
सर्व जिल्हाधिकारी.

विषय :- महानगरपालिका / जिल्हापरिषद, पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुका - २०१७ मान्यताप्राप्त पक्षाच्या उमेदवारांनी नामनिर्देशनपत्रामध्ये केवळ पक्षाच्या चिन्हाचा उल्लेख करण्याबाबत.
संदर्भ :- राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. एसईसी/आरपीपी-२००९/ सी.आर.४९ / डी.११,दि. ३१ मार्च, २००९.

महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २००९ अन्वये महानगरपालिका, जिल्हापरिषद व पंचायत समित्या तसेच नगरपरिषद / नगरपंचायत निवडणुकांकरिता निवडणूक चिन्हाचे आरक्षण व वाटप याबाबत तरतुदी केल्या आहेत. या आदेशाच्या परिच्छेद ६ मध्ये मान्यताप्राप्त राजकीय पक्षाद्वारे निवडणुकीला उभ्या करण्यात आलेल्या उमेदवारांना, त्यांच्या पक्षाकरिता आरक्षित करण्यात आलेल्या चिन्हाची निवड करता येईल व त्याचे त्यांना वाटप करता येईल आणि इतर कोणत्याही चिन्हाची निवड व वाटप करता येणार नाही, अशा आशयाची तरतूद आहे. राज्य निवडणूक आयोगाने संगणकीय प्रणालीमध्ये विहित केलेल्या नामनिर्देशनपत्रामधील सूचनांनुसार सर्व उमेदवारांनी, मग तो अपक्ष उमेदवार असो अथवा पक्षाचा पुरस्कृत उमेदवार असो, ३ चिन्हांची निवड करणे आवश्यक आहे. सदर सूचना नामनिर्देशनपत्राचा नमुना विहित करण्याकरिता काढलेल्या

आदेशांमध्ये देखील नमूद आहेत. मात्र सदर तरतूद ही महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश, २००९ च्या परिच्छेद ६ मधील तरतुदींशी विसंगत आहे. त्यामुळे राज्य निवडणूक आयोगाने संगणकीय प्रणालीमध्ये मान्यताप्राप्त राजकीय पक्षांतर्फे उमेदवारी अर्ज दाखल करताना, त्या पक्षाकरिता राखीव असलेले चिन्ह सोडून इतर कोणतेही चिन्ह मागता येणार नाही, अशी तरतूद केली आहे.

२. उमेदवारांना नामनिर्देशनपत्र भरताना चार उमेदवारी अर्ज भरण्याची मुभा असते. त्यानुसार संगणकीय प्रणालीमध्ये सोय उपलब्ध केलेली आहे. एखाद्या उमेदवारास राजकीय पक्षासोबत अपक्ष अथवा इतर पक्षातर्फे उमेदवारी अर्ज दाखल करावयाचा असल्यास, तो स्वतंत्र नामनिर्देशनपत्र भरुन दाखल करु शकतो. तसेच ज्या उमेदवाराने मान्यताप्राप्त राजकीय पक्षातर्फे नामनिर्देशनपत्र दाखल केले असेल, मात्र त्यांना पक्षाने पुरस्कृत केले नाही, तर अशा उमेदवारांना जरी त्यांनी मुक्त चिन्हांची मागणी केली असो किंवा नसो, अपक्ष उमेदवार म्हणून गृहित धरण्यात यावे. तसेच ज्या उमेदवारांनी मुक्त चिन्हांची मागणी केली नसेल, त्या उमेदवारांना चिन्ह वाटपाच्यावेळी इतर सर्व उमेदवारांना चिन्हाचे वाटप केल्यानंतर उर्वरित मुक्त चिन्हांमधून पसंतीक्रम देण्याची संधी देण्यात यावी व त्यानुसार चिन्ह वाटपाची प्रक्रिया पार पाडावी.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(शेखर चन्ने)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रत-
ॲड जे. बी.कासट,
१० नित लेआऊट, सत्यम अपार्टमेंट, रवी नगर, स्क्वेअर, नागपूर ४४० ०३३ यांना माहितीसाठी